International Journal for Multidisciplinary Research (IJFMR)

E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# शासकीय योजनेतून महिला शेतमजुरांचे सक्षमीकरण

**प्रणाली जगदीश शेंडे[1], प्रा. डॉ. प्रीती पु.पाटील[2]**

[1,2]पी. जी. टी. डी. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

**सारांश**

भारतीय अर्थव्यवस्थेचा 'कणा' म्हणून कृषी (शेती) क्षेत्राकडे बघितले जाते आणि याच कृषी क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा घटक म्हणजेच 'शेतमजूर' हा होय. 'शेती, शेतकरी आणि शेतमजूर' या तीनही घटकाचा फार जवळचा संबंध आहे कारण हे तीनही घटक एकमेकांना परस्परपूरक आहे. शेती उत्पादनात 'महिला शेतमजुरांचा' फार मोलाचा वाटा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार करता असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अशाच एका घटकातील म्हणजेच कृषी क्षेत्रातील अतिशय महत्त्वाचा घटक म्हणून 'महिला शेतमजूर' यांचा समावेश होतो. शेतातील बरीचशी कामे जसे नांगरणे, कुळपणे, पेरणी करणे, कापणे, पिकांना खाते देणे अशी विविध कामे महिला शेतमजूर करताना दिसतात.

आजही बऱ्याचशा महिला कौटुंबिक जबाबदारी सांभाळून शेतावर कामाला जाताना दिसतात. सामाजिक आर्थिक अशा अनेक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते. या समस्यांमध्ये कमी मजुरी (वेतन), कामाची अनिश्चितता, शिक्षणाचा अभाव, कर्जबाजारीपणा तसेच पिळून यांचा समावेश होतो. अशा विविध समस्येच्या निराकरणासाठी महिलांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय दृष्ट्या सक्षम बनविणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने विविध योजना अमलात आणून महिला सक्षमीकरणासाठी सुरुवात केली. बचत गट, उज्वला योजना, मनोधैर्य योजना, माझी लाडकी बहिणी इत्यादी सारख्या विविध योजनांमार्फत महिलांच्चे सक्षमीकरण करण्यात येत आहे. महिला शेतमजूरांच्या विविध समस्या जाणून घेणे व शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंध, 'शासकीय योजनेतून महिला शेतमजुरांची सक्षमीकरण' यावर लिखाण करण्यात आलेले आहे.

**बीजशब्द :–** महिला शेतमजूर, समस्या, सक्षमीकरण, उपाययोजना, शासकीय योजना.

**प्रस्तावना :–**

भारतीय समाजव्यवस्था, राजकीय व्यवस्था, आर्थिकव्यवस्था ही स्त्री आणि पुरुष या दोन्ही घटकावर अवलंबून आहे. स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक एक दुसऱ्यांना पूरक आहेत. कारण या दोघांपैकी एक जरी घटक कमकुवत असेल तर, त्याचा फटका देशाच्या संपूर्ण विकासावर बसतो. म्हणूनच स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक क्रियाशील असणे गरजेचे आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नारीशक्तींची संकल्पना पुरातन काळापासून अस्तित्वात आहे. भारतात अनादी काळापासूनच देवीच्या विविध रूपांची उपासना (पूजा) केली जाते. परंतु दुसऱ्या बाजूला मात्र महिलांना त्यांच्या जीवनात आणि कुटुंबात मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य पण दिले जात नाही. महिला शेतमजुरांच्या बाबतीत देखील हेच चित्र बघायला मिळते. स्वतः पैसा कमवत असून सुद्धा त्यांचे जीवन हे पुरुषांच्या अधीन असते. त्यांच्या आशा–आकांक्षांना महत्त्व दिले जात नाही. मुलगी, पत्नी, मातृत्वाची जबाबदारी, कौटुंबिक जबाबदारी निभावण्यातच महिला शेतमजुरांचे आयुष्य संपते.

महिला शेतमजुरांवर अन्याय, अत्याचार, बलात्कार, त्यांची शारीरिक, मानसिक पिळवनुक, नानाविध प्रकारचे वाईट कृत्य होताना दिसते. कधी कुटुंबात तर कधी कामाच्या ठिकाणी त्यांना हीन वागणूक अथवा मानसिक त्रास दिल्या जातो. अशा विविध प्रकारच्या जाचाला त्रासून वेळप्रसंगी त्या 'आत्महत्या' या मार्गाचा देखील त्या अवलंब करताना दिसतात. याच कारणास्तव करनात्सव महिला या सक्षम असणे अनिवार्य आहे. महिलांना सबल बनविणे, आत्मनिर्भर बनविणे हे आपणा सर्वांचे कर्तव्य आहे. महिलांची महत्ता लक्षात घेता शासनाने विविध योजनांद्वारे महिलांना आत्मकेंद्री, सक्षम बनविण्याचे कार्य हाती घेतले आहे.

**संदर्भ साहित्याचा आढावा :–**

**1 ) बन्सल श्रुती (2022)**

यांनी, 'महिला सक्षमीकरण आणि आर्थिक विकास – ग्रामीण भागातील एक दुतर्फा मार्ग' या लेखामध्ये ग्रामीण क्षेत्रातील महिलांच्या महत्तेबाबत लिखाण करून त्यांचे सक्षमीकरण, यांचा आर्थिक विकास सांगितलेला आहे. ग्रामीण महिला शेतकरी, शेतमजूरी, रोजंदारी, उद्योजक इत्यादी कामे करून ग्रामीण अर्थव्यवस्थेत महत्त्वाची भूमिका बजावतात तसेच घरकाम, वृद्धांची, मुलांची काळजी घेणे, कुटुंबातील इतर सदस्यांची काळजी घेणे अशा अनेक भूमिकेत सक्रिय सहभाग दर्शवितात. परंतु बऱ्याचदा महिलांशी शिक्षण, आरोग्य, काम, जीवनशैली, स्वातंत्र्य यामध्ये भेदभाव केल्या जातो. त्यांना पुरुष कामगारांपेक्षा खूपच कमी वेतन दिले जाते असे आढळले.

**2 ) सपकाळे श्री. सुनील रमेश (2025)**

यांनी, 'भारतातील महिला सक्षमीकरण : प्रगती आणि आव्हाने' या शोधनिबंधाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण तसेच महिलांच्या सर्वांनी विकासातील विविध आव्हाने यावर प्रकाश टाकला. तसेच भारतात महिलांच्या सक्षमीकरणांमध्ये अतुलनीय प्रगती झाली त्याचबरोबर अनेक आव्हानेही आहे. आर्थिक सहभाग, शिक्षण आणि कायदेशीर सुधारणा यामधील प्रगतीमुळे महिला पुढे गेल्या. परंतु आजही सामाजिक नियम तसेच खोलवर रुजलेले पूर्वग्रह महिला सक्षमीकरणांमध्ये अडथळा निर्माण करीत आहे असे निदर्शनास आले.

**3 ) शिंदे प्रा. डॉ. आर. के. (2025)**

यांच्या 'शासकीय योजना आणि महिला सबलीकरण' या शोधनिबंधात, स्त्रियांचे अधिकार, स्वातंत्र्य, स्त्रियांची कर्तव्यदक्षता यावर लिखाण आढळले. शासनाने, महिलांची आर्थिक परिस्थिती सुधारावी स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव वाढावा, सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक दृष्ट्या सुधारणा, प्रगती व्हावी यासाठी वेगवेगळ्या योजना सुरू केल्या. केंद्र तसेच महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांमुळे महिला सक्षम होत आहे असे चित्र प्रस्तुत शोधनिबंधात आढळले.

**अध्ययनाचा उद्देश :–**

1. महिला शेतमजुरांच्या समस्या जाणून घेणे.
2. महिला सक्षमीकरणाच्या विविध योजनांचे महत्त्व अभ्यासणे.
3. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या, महिला शेतमजुरांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.
4. 'महिला शेतमजूर' सक्षमीकरणामध्ये शासनाच्या विविध योजनांच्या कार्याचा अभ्यास करणे.

**गृहीतके :–**

1. शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचे, महिला शेतमजुरांचे सक्षमीकरण होत आहे.
2. महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना या महिलांना सक्षम बनविण्यासाठी महत्त्वाच्या आहे.
3. शासनाच्या विविध योजनांमुळे महिला शेतमजुरांचा विकास होऊन त्या आत्मनिर्भर, आत्मकेंद्री बनत आहे.
4. महिला सक्षमीकरणांमध्ये शासनाच्या विविध योजनांचे कार्ये अतुलनीय आहे.

**संशोधन पद्धती :**

'शासकीय योजनेतून महिला शेतमजुरांचे सक्षमीकरण' या विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येईल. हे अध्ययन प्राथमिक तसेच दुय्यम अशा दोन्ही स्त्रोतांवर आधारित आहे. सोबतच सर्वेक्षण पद्धतीचा वापर करून माहिती गोळा केल्या जाईल व उपलब्ध असणाऱ्या सामग्रीवर आधारित विश्लेषण करण्यात येईल.

**तथ्य संकलन :–**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक तसेच द्वितीय स्त्रोतांच्या आधारे माहिती गोळा करण्यात आली. याकरिता संबंधित विषयाच्या दृष्टिकोनातून वृत्तपत्रे,

शोधपत्रिका, मासिके, पुस्तके, इंटरनेटचा तसेच विविध वेबसाईटचा वापर करण्यात आलेला आहे.

**महिला सक्षमीकरण :–**

महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ, 'स्त्रीच्या बुद्धिमत्तेला, कार्यक्षमतेला, निसर्गदत्त शक्तीला, धारणक्षमतेला फुलविणे तसेच स्वतःची खरी ओळख, विचार, स्वातंत्र्य, अभिव्यक्ती आणि कृती तसेच महिलांच्या जीवनातील प्रत्येक क्षेत्राला हाताळण्याचे सामर्थ्य महिलांमध्ये निर्माण करणे होय'. सबलीकरणालाच दुसऱ्या शब्दात 'सक्षमीकरण' म्हटले जाते. या शब्दाचा विस्तृत अर्थ बघितल्यास असे लक्षात येते की, महिलांना सबल करणारी आणि त्यांच्यातील दुर्बलता नष्ट करण्याची, तिच्या शरीर, मन, बुद्धीत स्वतःची जाणीव, ओळख तसेच स्वतःबद्दल जागृकता निर्माण करून त्यादृष्टीने स्वयंविकासासाठी प्रवृत्त करणारी संकल्पना होय. महिलांना केवळ त्यांच्या क्षमतेची, त्यांच्या अस्तित्वाची जाणीव करून न देता त्यासोबतच त्यांना विविध संधी सुविधा व आंतरिक तसेच बाह्य वातावरण निर्माण करून देणे, त्यांच्यातील गुण कौशल्यांचा वापर करून त्यांच्यात आत्मविश्वास विकसित करणे, सामाजिक, आर्थिक, मानसिक दृष्ट्या स्वावलंबी होऊन स्वयंप्रतिष्ठा प्राप्त करणे. महिलांविरुद्ध होणाऱ्या अन्याय व शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याची पात्रता निर्माण करणे म्हणजेच महिला सक्षमीकरण होय.

महिला शेतमजुरांचा विचार करता, त्या जमिनीच्या मशागतीपासून पतर पीक काढणीनंतरही, शेतातील विविध कामे करताना दिसतात. कुटुंबाची जबाबदारी स्वीकारून शेतावर कामाला जातात. आणि रोजंदारी तत्वावर, सालदारी तत्वावर तर कुणी काही कालावधीसाठी मजुरीसाठी स्थलांतरित होतात. हा सगळा व्याप सांभाळत असताना त्यांना बऱ्याच अडचणी येतात. समाजातील दुय्यम, गौण स्वरूपाचा दर्जा, शैक्षणिक, मानसिक, शारीरिक समस्या, अत्यल्प मजुरी, धार्मिक, आर्थिक, राजकीय समस्या अशा विविध समस्या यांच्या वाट्याला येतात. त्यांच्या या समस्या लक्षात घेऊन समाजातील प्रत्येक व्यक्तीने महिलांना आत्मनिर्भर बनविणे गरजेचे आहे. यासाठी शासन देखील विविध योजनांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करत आहे. कारण महिलांचा विकास म्हणजेच कुटुंबाचा, समाजाचा व पर्यायाने देशाचा विकास होय. या विविध शासकीय योजना पुढीलप्रमाणे आहेत.

**शासकीय योजना :–**

**किमान वेतन कायदा :–** इ.स. 1948 मध्ये महिला शेतमजुरांनाही किमान वेतन कायदा लागू करण्यात आला. घटक राज्यांना महिला शेतमजुरांचे किमान वेतन निश्चित करण्यास सांगितले. त्यामुळे वेगवेगळ्या राज्याच्या परिस्थितीनुसार किमान वेतन पातळी भिन्न आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र आजही या कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही.

**ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना :–** 15 ऑगस्ट 1983 रोजी भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी द्वारा सहावी पंचवार्षिक योजनेच्या दरम्यान, ग्रामीण भूमिहीन रोजगार हमी योजना सुरू करण्यात आली. या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे कुटुंबीयांना रोजगार उपलब्ध करून ग्रामीण क्षेत्राची उत्पादकता वाढविणे हा आहे.

**रोजगार हमी योजना :–** रोजगार हमी योजना ही 1972–73 मध्ये अमलात आणली. या योजनेनुसार महाराष्ट्रातील कोणत्याही प्रौढ व्यक्तीला म्हणजेच 18 वर्षावरील व्यक्तीस अकुशल शारीरिक काम देण्याची हमी सरकारने घेतली आहे.

**एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम :–** ग्रामीण भागातील कुटुंबांना दारिद्र्य रेषेच्या वर घेण्यासाठी तसेच त्यांचे चांगले जीवनमान टिकवून ठेवण्यासाठी मदत करणे हे या एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. 2 ऑक्टोबर 1980 मध्ये हा कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**जवाहर रोजगार योजना :–** ग्रामीण भागातील बेरोजगार तसेच अर्ध – बेरोजगारांना काम उपलब्ध करून देणे. या उद्देशाने एप्रिल 1989 मध्ये जवाहर रोजगार योजना सुरू करण्यात आली. योजनेअंतर्गत 440 दशलक्ष कुटुंबीयांना लाभ मिळाला.

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (MGNREGA):-** या योजनेअंतर्गत महिलांना 33% आरक्षण देण्यात आले. रोजगाराच्या हानीमुळे महिलांचा आर्थिक सहभाग वाढतो. या योजनेअंतर्गत अवकुशल शारीरिक काम करण्यासाठी स्वयंसेवा करणाऱ्या प्रत्येक कुटुंबाला आर्थिक वर्षात किमान 100 दिवसांची रोजगाराची हमी दिली जाते. मनरेगा ही योजना प्रामुख्याने ग्रामपंचायती द्वारे (GP) राबविली जाते. जानेवारी 2024 ते डिसेंबर 2024 पर्यंत या योजनेअंतर्गत 306 लाख कुटुंबीयांना रोजगार उपलब्ध झाला.

**बालिका समृद्धी योजना :**– मुलींचा सर्वांगीण विकास होण्यासाठी तसेच त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी बालिका समृद्धी ही योजना स्थापन केल्या गेली. ही योजना 15 ऑगस्ट 1997 नंतर जन्मलेल्या वंचित मुलींच्या शिक्षणासाठी निधी देते आणि या निधीच्या माध्यमातून महिलांना, बालिकेला मदत केल्या जाते. ही योजना सुरू झाल्यापासून 50 हजार हून अधिक लोकांना याचा लाभ झाला आहे.

**उद्योगिनी योजना :**– महिला सक्षमीकरणाच्या इतर योजनांप्रमाणेच 'उद्योगिनी योजना' या योजनेचा विचार केला जातो. ही योजना प्रामुख्याने कृषी, किरकोळ आणि इतर कोणत्याही लहान व्यवसाय क्षेत्रातील महिलांच्या कल्याणार्थ तयार करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत एक लाख रुपये पर्यंतचे कर्ज मिळू शकते व ही योजना 18 ते 45 वर्ष वयोगटातील महिलांसाठी आहे.

**मनोधैर्य योजना :**– या योजनेअंतर्गत बलात्कार, बालिकांवरील लैंगिक अत्याचार आणि ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या महिला आणि बालिकांना अर्थसहाय्य केले जाते. तसेच महिलांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांना आर्थिक मदत दिली जाते. ही योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत एकूण लाभार्थ्यांची संख्या किती बाबत नेमकी आकडेवारी उपलब्ध नाही परंतु फेब्रुवारी 2025 मध्ये दिलेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील 1126 पीडितांना 9 कोटी 13 लाख रुपयांची आर्थिक मदत पीडितांना देण्यात आलेली आहे.

**महिला बचत गट :**– या योजनेअंतर्गत महिलांना एकत्रित आणून त्यांना वेगवेगळ्या व्यवसायाचे, उद्योगाचे प्रशिक्षण देऊन आर्थिक सहाय्य केले जाते. या योजनेअंतर्गत महिला बचत गटांना पाच लाख ते वीस लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. तसेच व्याजदर हा 4% प्रति वर्ष तर परतफेड कालावधी तीन वर्ष आहे. महाराष्ट्रातील आर्थिक विकास महामंडळाने 31 मार्च 2020 पर्यंत, 3200 बचत गट तयार केले होते. आजही तळागाळातील, ग्रामीण भागातील, शहरी भागातील विविध महिला बचत गट या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेत आहेत.

**विधवा पेन्शन योजना :**– ही योजना महिलांच्या, महिला शेतमजुरांच्या सक्षमीकरणात अधिक भर घालणारी योजना ठरत आहे. या योजनेला 'इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा पेन्शन योजना' असेही संबोधल्या जाते. या योजनेअंतर्गत 40 ते 65 वयोगटातील विधवा तसेच 18 वर्षापेक्षा जास्त वयाच्या विधवा महिलांना दरमहा 600 रुपये पेन्शन दिले जाते. आजही बऱ्याच महिला या योजनेचा लाभ घेत आहे.

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना :**– 28 जून 2024 रोजी ही योजना सुरू करण्यात आली. ही योजना महिला व बालविकास विभाग महाराष्ट्र शासनातर्फे 25 ते 65 वयोगटातील महिलांसाठी सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा 1500 रुपये रक्कम दिली जाते. महिलांचा आर्थिक स्तर उंचवावा, त्यांचे आरोग्य आणि पोषण सुधारावे या अनुषंगाने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली. लाडकी बहिणी योजनेअंतर्गत सध्या सरकारकडून 2 कोटी 47 लाख महिलांना लाभ देण्यात येतोय.

**निष्कर्ष :–**

'शासकीय योजनेतून महिला शेतमजुरांचे सक्षमीकरण' या संशोधनाअंतर्गत असा निष्कर्ष काढल्या गेला की, महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना महिलांच्या सक्षमीकरण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन आहे. या योजनांच्या यशस्वीतेसाठी समाजातील सर्वच घटकांचे सहकार्य आवश्यक आहे. शासकीय योजनांमार्फत महिला तसेच महिला शेतमजुरांचा आर्थिक विकास, कौटुंबिक विकास होऊन त्यांच्यात सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास मदत होईल. महिलांच्या बाबतीत सखोल विचार करूनच शासनाने वरील प्रकारे अनेक योजनांचा विचार केलेला आहे. ग्रामीण असो अथवा शहरी भागातील महिला असो त्यांच्यात शैक्षणिक, आरोग्यात्मक, रोजगार, शिक्षणाचा विकास होऊन त्या आत्मकेंद्री बनायला हव्या. अशा प्रकारच्या शुद्ध हेतूच्या पूर्ततेसाठी फक्त शासनानेच नव्हे तर आपण सर्वांनी देखील महिला सक्षमीकरणासाठी पाऊल उचलायला हवी.

**सूचना व शिफारशी :–**

आजही तळागाळातील, ग्रामीण अशिक्षित महिला तसेच महिला शेतमजुरांच्या अडचणी दिवसेंदिवस वाढतच आहे. तसेच शासनाच्या विविध योजनांविषयी माहिती देऊन या योजनांचा लाभ घेण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले पाहिजे. मुलींना गुणवत्ता पूर्ण शिक्षण देऊन, शिक्षणासंबंधी महिलांना जागृत करणे गरजेचे आहे. तसेच महिलांमध्ये त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांबाबत जाणीव करून हिंसाचार आणि भेदभावापासून त्यांना संरक्षण देण्यासाठी विविध कायदे आणि धोरण तयार करणे गरजेचे आहे. यामुळे महिला अधिक सतर्क, सजग होवून महिला शेतमजुरांमध्ये आत्मविश्वास वाढन त्या अधिक आत्मनिर्भर बनतील.

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. गोटे शुभांगी (2004),– 'महिला सक्षमीकरण स्वरूप समस्या', वरद प्रकाशन औरंगाबाद.
2. शर्मा प्रज्ञाराणी (2006),– 'महिला विकास व सशक्तिकरण', अविष्कार प्रकाशन दिल्ली.
3. सिंह निशांत (2011), – 'स्त्री सशक्तिकरण – एक मूल्यांकण', कृषी पब्लिकेशन गाझियाबाद.
4. गायकवाड प्रा. डॉ. एम. जे. (2015), – 'रोजगार हमी योजना आणि शेतमजूर स्त्रियांचे आर्थिक सबलीकरण', प्रशांत पब्लिकेशन ; फर्स्ट एडिशन.
5. नाडगोडे जी. डी. (1997), – 'ग्रामीण समाजशास्त्र', कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे.
6. सपकाळे श्री. सुनील रमेश (2025), – 'भारतातील महिला सक्षमीकरण प्रगती आणि आव्हाने',
7. Journal of East – West Thought (JET) ISSN (O) : 2168-2259, UGC CARE I, 15 (1), 234-241, 2025.
8. शिंदे प्रा. डॉ. आर. के. (2025),– 'शासकीय योजना आणि महिला सबलीकरण',
9. Journal of East – West Thought (JET) ISSN (O) : 2168-2259, UGC CARE I, 15 (1), 729-734,2025.

**WEBSITES:-**

1. www.shodhaganga
2. www.jetjournal.com